**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २१ सप्टेंबर २०२६**

**ठळक बातम्या**

1. **राज्यासाठी जागतिक कार्यबल गतीशिलता धोरण जाहीर; भारताचे २८ देशांसोबत कामगार गतिशीलतेसंदर्भात करार.**
2. **भारत आणि न्यूझीलंड मुक्त व्यापार करार येत्या २० ऑक्टोबरपासून लागू होणार.**
3. **२९ सप्टेंबर रोजी आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी रोजगार महाकुंभ'ला आतापर्यंत १ हजार ५८८ नियोक्त्यांची नोंदणी.**
4. **बंगालच्या उपसागरातील हवामान प्रणालीच्या प्रभावामुळे २३ सप्टेंबरपासून विदर्भात पावसाचा जोर वाढणार.**

---------------------------------------

गतीशिलता धोरण

महाराष्ट्रातील युवक-युवतींना आंतरराष्ट्रीय रोजगारासाठी कौशल्य आणि भाषा प्रशिक्षण देण्यावर भर देण्यात येत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. देशनिहाय ‘स्किल पासपोर्ट’ तयार करून प्रशिक्षण संस्थांनी अभ्यासक्रम अद्ययावत करावेत, तसेच सुरक्षित भरती व्यवस्था विकसित करावी, असे निर्देश त्यांनी दिले. मुंबईत झालेल्या आंतरराष्ट्रीय कामगार गतिशीलतेवरील परिषदेत महाराष्ट्रासाठी जागतिक कार्यबल गतीशिलता धोरण २०२६ जाहीर करण्यात आलं. भारताने २८ देशांसोबत कामगार गतिशीलतेसंदर्भात करार केले असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. डिजिटल इंडिया भाषिणी, ‘मित्रा’ आणि ‘महिमा’ यांच्यात भाषा प्रशिक्षणासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या माध्यमातून विद्यार्थ्यांना परदेशी आणि व्यवसायनिहाय भाषांचे मोफत प्रशिक्षण मिळणार आहे.

---------------------------------------

मुक्त व्यापार करार

भारत आणि न्यूझीलंड मुक्त व्यापार करार येत्या २० ऑक्टोबरपासून लागू होणार आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयुष गोयल यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. या करारामुळे न्यूझीलंडमधे निर्यात होणाऱ्या

कोणत्याही भारतीय उत्पादनावर शुल्क आकारलं जाणार नाही. येत्या ४ ते ५ वर्षांत परस्परातला व्यापार दुपटीने वाढवून ३५ हजार कोटी रुपयांपर्यंत नेण्याचं समान उद्दिष्ट या करारात नमूद केलं असल्याचं त्यांनी सांगितलं. या करारामुळे वस्त्र, प्रावरणं, चामड्याच्या वस्तू, अभियांत्रिकी वस्तू, औषधं, शेतमाल आणि प्रक्रीयाकृत खाद्यपदार्थ या भारतीय उत्पादनांना न्यूझीलंडमधे चांगला वाव मिळेल असं ते म्हणाले. तसंच न्यूझीलंडमधली लोकर, मेंढीचं मांस, तसंच चामड्याच्या वस्तूंच्या विक्रीवर भारतात शुल्क आकारलं जाणार नाही.  व्यापार, सेवा, गुंतवणूक, शिक्षण, क्रीडा, वाहतूक आणि शेती या क्षेत्रांमधे संबंध मजबूत करण्यावर या करारात भर दिला आहे.

---------------------------------------

सेवा संकल्प- स्वच्छ भारत अभियान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजकीय कारकीर्दीला २५ वर्षं पूर्ण होत आहेत. 'जनसेवेतून देशसेवा' हा मंत्र आणि सतत समर्पणभावाचा' हा प्रवास आहे. सेवा आणि सुशासन या दोन सूत्रांचा अवलंब करत २०४७ पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट साकार करण्यासाठी सरकार सातत्यानं काम करत आहे. सर्वसमावेशक विकास आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून नागरिकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडत आहेत. या विशेष मालिकेत आज आपण ऐकणार आहोत स्वच्छ भारत अभियानाबद्दल...

***(व्हॉइस कास्ट - नम्रता)***

***२०१४ मध्ये सुरू करण्यात आलेल्या स्वच्छ भारत मिशननं स्वच्छतेचा विषय केवळ सार्वजनिक आरोग्यापुरता मर्यादित न ठेवता, त्याचं रूपांतर देशव्यापी जनआंदोलनात केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छता, सन्मान आणि वर्तनातील बदल यांना या अभियानाच्या केंद्रस्थानी ठेवलं. या अभियानांतर्गत देशभरात १२ कोटींहून अधिक घरगुती शौचालयांची उभारणी करण्यात आली. स्वच्छ भारत मिशनचा परिणाम केवळ शौचालय उभारणीपुरता मर्यादित राहिला नाही. २०२४ मधील एका अभ्यासानुसार, शौचालयांची अधिक व्याप्ती असलेल्या जिल्ह्यांमध्ये अर्भक आणि पाच वर्षांखालील बालकांच्या मृत्यूदरात लक्षणीय घट आढळून आली आणि स्वच्छतेच्या सवयीनमुळे दरवर्षी सुमारे ७० हजार अर्भकांचे मृत्यू टाळण्यास मदत झाली. स्वच्छ सर्वेक्षणामुळे या अभियानाला स्पर्धात्मक स्वरूप मिळालं. देशभरातील शहरं आणि नगरं स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि नागरिकांच्या सहभागातील सुधारणांसाठी स्पर्धा करू लागली. २ ऑक्टोबर २०१४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी***

*यांनी स्वतः झाडू हाती घेत स्वच्छता अभियानात सहभाग घेतला. त्यानंतर त्यांनी नऊ प्रमुख व्यक्तींना या चळवळीत सहभागी होण्याचं आवाहन केलं आणि प्रत्येकानं आणखी नऊ जणांना सहभागी करून घ्यावं, असं सांगितलं. या उपक्रमातून सेवाभावाची साखळी निर्माण झाली आणि स्वच्छ भारत अभियानाला जनआंदोलनाचं व्यापक स्वरूप मिळालं. स्वच्छ भारत मिशननं स्वच्छतेला मूलभूत गरज म्हणून अधोरेखित केलं. शौचालयं ही केवळ सुविधा नसून आरोग्य, सन्मान आणि मानवी विकासाची साधनं आहेत, हा संदेश या अभियानानं समाजापर्यंत पोहोचवला.*

दरम्यान 'स्वच्छता ही सेवा' या अभियानांतर्गत आज अंबाझरी जैव विविधता उद्यान इथं आकाशवाणी नागपूरच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येनं उपस्थित राहून स्वच्छता मोहीम राबविली.

---------------------------------------

सेवा संकल्प

गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव इथल्या ब्लॉक पब्लिक हेल्थ युनिटमध्ये सेवा संकल्प अभियाना अंतर्गत उद्या पासून डेंग्यू, चिकुनगुनिया आणि स्क्रब टायफससाठी एलिझा चाचणी सुविधा सुरू करण्यात येणार आहे. या सुविधेमुळे तालुक्यातील नागरिकांना स्थानिक पातळीवर मोफत तपासणीचा लाभ मिळणार असून, संशयित रुग्णांचे नमुने तपासणीसाठी पाठविण्याचं आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विनोद चव्हाण यांनी केलं आहे.

---------------------------------------

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य

वाशिम जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत शाळा आणि अंगणवाड्यांमधील बालकांच्या आरोग्य तपासणीत १९ मुलांच्या हृदयात गंभीर दोष आढळले. जिल्हा रुग्णालयातील विशेष 2D Echo शिबिरानंतर या मुलांना ‘सेवा संकल्प अभियान’अंतर्गत मोफत हृदय शस्त्रक्रियेसाठी मुंबईला रवाना करण्यात आलं. आयुष्मान भारत आणि महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून भायखळा येथील बालाजी रुग्णालयात या शस्त्रक्रिया होणार आहेत.

---------------------------------------

आयुर्वेद दिन

केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज नवी दिल्ली येथे पत्रकार परिषदेत अकराव्या आयुर्वेद दिनाच्या कार्यक्रमांची माहिती दिली. आयुर्वेद दिनाचा मुख्य सोहळा 23 सप्टेंबरला नागपूर इथं सुरेशभट सभागृह इथं ‘उद्याच्या निरोगी

जीवनासाठी आयुर्वेद’ या संकल्पनेवर आयोजित केला जाणार आहे. प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, योग्य आहार, निरोगी जीवनशैली आणि मानसिक संतुलनाचे महत्त्व मंत्री जाधव यांनी यावेळी अधोरेखित केले आणि आयुर्वेदाविषयी अचूक आणि पुराव्यावर आधारित माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

---------------------------------------

प्रतिसाद

येत्या २९ तारखेला आयोजित केल्या जाणाऱ्या पंडित दीनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी रोजगार महाकुंभा’ला नामांकित कंपन्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत १ हजार ५८८ नियोक्त्यांनी नोंदणी केली असून, त्यांच्या माध्यमातून ७१ हजार ९३९ प्राथमिक रोजगार संधी उपलब्ध झाल्या आहेत. रोजगार महाकुंभात टाटा मोटर्स, महिंद्रा अँड महिंद्रा, गोदरेज एंटरप्रायझेस ग्रुप, LIC, HDFC, ICICI, ॲक्सिस बँक, मारुती सुझुकी, बॉश, यांसारख्या नामांकित कंपन्या आणि संस्थांचा सहभाग आहे. ऑटोमोबाईल, उत्पादन, बँकिंग, वित्तीय सेवा, आयटी, शिक्षण, आरोग्य, लॉजिस्टिक्स आणि इतर विविध क्षेत्रांतील कंपन्यांकडून रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्यानं विविध शैक्षणिक पात्रता आणि कौशल्यं असलेल्या युवकांना त्यांच्या आवडीनुसार रोजगाराच्या संधी शोधता येतील, असं राज्य शासनाच्या प्रसिद्धिपत्रकात म्हटलं आहे. २९ सप्टेंबरपर्यंत नियोक्त्यांची संख्या २ हजार ५०० पेक्षा जास्त होण्याची अपेक्षा आहे.

---------------------------------------

पाहणी

राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे सह-पालकमंत्री संजय सावकारे यांनी आज मलकापूर आणि मोताळा तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतीच्या पिकांची प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी केली. यावेळी मोताळा तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने मंत्री सावकारे यांना निवेदन देऊन तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी करण्यात आली. दरम्यान सोशल मीडियावर सध्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बनावट यादया फिरत असून राज्य शासनाकडून अशा प्रकारच्या कोणत्याही यादया प्रसिद्ध करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांनी या अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन त्यांनी केलं.

---------------------------------------

अमरावती दुष्काळग्रस्त

अमरावती जिल्ह्यातील आठ तालुके दुष्काळग्रस्त घोषित झाल्याची सोशल मीडिया आणि प्रसारमाध्यमांवरील माहिती असत्य आणि दिशाभूल करणारी असल्याचं जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केलं आहे. दुष्काळ जाहीर करण्यासाठी पर्जन्यमान, पीकस्थिती आणि विविध निर्देशांकांच्या मूल्यांकनाची प्रक्रिया सुरू असून, अंतिम निर्णय राज्य शासन घेणार आहे. दरम्यान, शेतकऱ्यांना आवश्यक मदत उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक तहसील कार्यालय आणि तालुका कृषी अधिकारी कार्यालयात ‘शेतकरी मदत कक्ष’ स्थापन करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. दरम्यान, जिल्ह्यात निर्माण झालेल्या गंभीर दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, महसूल, कृषी, ग्रामविकास, नगरविकास, भूमी अभिलेख, महावितरण, पशुसंवर्धन, जलसंपदा आणि जलसंधारण या विभागांतील सर्व जिल्हा आणि तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना मुख्यालय सोडण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

---------------------------------------

हर्षवर्धन सपकाळ

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदत देण्याची मागणी मुंबई इथं केली. दुष्काळ निवारणासाठीची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगत सरकार मदत देण्यास विलंब करत असल्याचा आरोप त्यांनी केला. आरक्षणाच्या मुद्द्यावरून जाती-जातींमध्ये संघर्ष निर्माण करणे हे भाजपचे धोरण असल्याचा आरोप त्यांनी केला.

---------------------------------------

हवामान

नागपूर प्रादेशिक हवामान विभागाने विदर्भात पुढील काही दिवस पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज वर्तवला आहे. बंगालच्या उपसागरातील हवामान प्रणालीच्या प्रभावामुळे २३ सप्टेंबरपासून विदर्भात मुसळधार पावसाला सुरुवात होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २३ सप्टेंबर रोजी विदर्भात मुसळधार, तर २४ आणि २५ सप्टेंबर रोजी काही भागांत अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. २६ सप्टेंबरलाही काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. या काळात वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याची शक्यताही हवामान विभागाने व्यक्त केली आहे. विशेषतः गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया आणि यवतमाळसह विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर अधिक राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी हवामान विभागाच्या सूचनांकडे लक्ष देऊन

आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आलं आहे. याबाबत नागपूर प्रादेशिक हवामान विभागाचे शास्त्रज्ञ प्रवीण कुमार यांनी अधिक माहिती दिली आहे.

----------------------------------------